# आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष – २०२३



कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

# आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष – २०२३

- मा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने भारत सरकारने प्रस्तावित केल्या प्रमाणे संयुक्त राष्ट्र संघाने २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष म्हणून घोषित केले आहे.
- या प्रस्तावास ७२ देशांनी समर्थन दर्शवले आहे.
- भारत सरकारने आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष लोक चळवळ होण्याच्या दृष्टीने २०२३ हे वर्ष साजरे करण्याचे ठरवले आहे.






सिल्लोड, जि. औरंगाबाद : कृषी महोत्सवाचे उद्घाटन करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे. या वेळी डावीकडून सहकारमंत्री अतुल सावे, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, कृषिमंत्री अब्दुल सत्तार, केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, संदीपान भुमरे आदी.

## सिल्लोड महोत्सवाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

ॲग्रोवन वृत्तसेवा

औरंगाबाद : सिल्लोड येथील कृषी महोत्सवाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते रविवारी (ता. १) उद्घाटन झाले.

या प्रसंगी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, पालकमंत्री संदीपान भुमरे, कृषिमंत्री अब्दुल सत्तार, सहकारमंत्री अतुल सावे, खासदार इम्तियाज जलील, कृषी विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, कृषी आयुक्त सुनील चव्हाण आदी उपस्थित होते.

या वेळी शेतीतील नवतंत्रज्ञान, नवे प्रयोग याविषयी शेतकऱ्यांकडून मुख्यमंत्री शिंदे यांनी माहिती जाणून घेतली. या प्रदर्शनात शासनाच्या विविध योजनांचे सादरीकरण, ३२ चर्चासत्रे होणार आहेत. आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष २०२३ चे उद्घाटन या वेळी करण्यात आले.

# पौष्टिक तृणधान्य SMART FOODS

## वापरकर्त्या साठी फायदे

- कमी ग्लायसिमिक इंडेक्स
- खनिजे ,जीवनसत्वे व Antioxident ने भरपूर
- जीवनशैली रोगा स प्रतिबंध

## शेतकर्यांसाठी फायदे

- कमी कालावधीची पिके
- कमी साधन संपती वर येणारी पिके
- हवामान बदलास अनुकूल, तग धरणारी पिके



## वसुंधरेसाठी फायदे

- कमी पाण्यावर येणारी
- झिरो कार्बन फुटप्रिंट
- उर्जा कार्यक्षम पिके

# प्रमुख तृणधान्य पिकांच्या तुलनेत पौष्टिक तृणधान्यातील अन्नघटकांचे प्रमाण (प्रति १०० ग्रॅम)

| पिक | प्रोटीन (ग्रा.) | कार्बोहाइड्रेट (ग्रा.) | स्निग्ध पदार्थ (ग्रा.) | तंतुमय पदार्थ (ग्रा.) | खनिज पदार्थ (ग्रा.) | कॅल्शियम (मिग्रा) | फासफोरस (मिग्रा) | लोह (मी.ग्र) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ज्वारी | १०.४ | ७२.६ | १.९ | १.६ | १.६ | २५ | २२२ | ४.१ |
| बाजरी | ११.६ | ६७.५ | ५.० | १.२ | २.३ | ४२ | २९६ | ८ |
| नाचणी | ७.३ | ७२.० | १.३ | ३.६ | २.७ | ३४४ | २८३ | ३.९ |
| वरई | १२.५ | ७०.४ | १.१ | २.२ | १.९ | १४ | २०६ | ०.८ |
| राळा | १२.३ | ६०.९ | ४.३ | ८.० | ३.३ | ३१ | २९० | २.८ |
| कोद्रा | ८.३ | ६५.९ | १.४ | ९.० | २.६ | २७ | १८८ | ०.५ |
| सावा | ८.७ | ७५.७ | ५.३ | १२.२ | १.७ | १७ | २२० | १५ |
| बार्टी | ६.२ | ६५.५ | २.२ | ९.८ | ४.४ | २० | २८० | ५.० |
| गहू | ११.८ | ७१.२ | १.५ | १.२ | १.५ | ४१ | ३०६ | ५.३ |
| भात | ६.८ | ७८.२ | ०.५ | ०.२ | ०.६ | १० | १६० | ०.७ |
| क्विनोवा | १६.५ | ६९ | ६.३ | १४ | | १४८.७ | ३८३.७ | १३.२ |

(स्रोत: एनआयएन, हैदराबाद)

**भात व गहू या प्रमुख पिकांच्या तुलनेत पौष्टिक तृणधान्यांचे आहारातील महत्व लक्षात येईल**

# प्रमुख पौष्टिक तृणधान्य






| अ.क्र. | इंग्रजी | मराठी |
|---|---|---|
| १ | Pearl millet | बाजरी |
| २ | Sorghum | ज्वारी |
| ३ | Finger millet | नाचणी |
| ४ | Foxtail millet | राळा |
| ५ | Little millet | सावा, हळवी |
| ६ | Proso millet | वरई, वरी |
| ७ | Kodo millet | कोद्रा |
| ८ | Barnyard millet | बर्टी |

# प्रमुख पौष्टिक तृणधान्य



## ज्वारी

- भातापेक्षा जास्त पोषण तत्वे.
- तंतुमय पदार्थाने संतृप्त
- थायमिन, रायबोफ्लेवीन ,फोलिक असिड ,कॅल्शियम
- लोह,झिंक,सोडियम फोस्फोरास व बिटा कॅरोटीन समृद्ध

## ज्वारी

- हृदय विकारावर उपयुक्त
- स्थूलता व संधिवात या वर परिणामकारक
- गर्भवती महिलांना खनिज व जीवनसत्वे उपलब्धतता



## बाजरी

- कॅल्शियम, विटामिन A,B फोस्फोरस अधिक मात्रेत उपलब्धतता
- लोह,फोलेट व मंगेनीज यांची उपलब्धतता
- Unsaturated फात्त्य Acid संतृप्त

## बाजरी

- रक्तातील मेदाचे प्रमाण नियंत्रित करते
- रक्तदाब करिता उपयुक्त



## नाचणी

- प्रथिने, व्हिटामिन A, फोस्फोरस
- अमिनो असिड मुबलक प्रमाणात
- कॅल्शियम ची उपलब्धता अधिका प्रमाणात

## नाचणी

- तंतुमय पदार्था मुळे आतड्यांचा कर्करोगावर उपयोगी
- Cholesterol प्रमाण नियंत्रित करते.
- बद्धकोष्ठता साठी फायदेशीर
- प्रथिनांमुळे कुपोषणावर उपयुक्त
- मधुमेह रुग्नाम्कारिता लाभदायक

**(स्रोत: IIMR , हैदराबाद)**

# बारीक पौष्टिक तृणधान्य

## कुटकी



- सर्वात जास्त ३७ टक्के तंतुमय पदार्थ
- शिशु आहाराकरिता उपयोगी
- आहार औषधी म्हणून वापर

## राळा §



- कॅल्शियम ,तंतुमय पदार्थ व तांबे मुल्द्रव्याने भरपूर
- रक्तातिल साखर व मेद नियंत्रित
- रोगप्रतिकारक शक्ती वाढवते
- पाचन संस्थेच्या विकारावर परिणाम कारक
- नोन अल्लेर्जीक व पचनास हलके

## कोडो/कोद्रा



- लेसिथिन समृध्द ,विटामिन B, कॅल्शियम,लोह,पोटाशियाम , झिंक यांनी समृद्ध
- ग्लुटन मुक्त
- मज्जा संस्था मजबुतीस उपयुक्त
- पचनाला हलके

## पौष्टिक तृणधाण्याचे सर्वसाधारण फायदे

ग्लुटेन फ्री
तंतुमय पदार्थाने समृद्ध
खनिजे व जीवनसत्वे भरपूर
रोगप्रतिकारक शक्ती वाढवते
पाचन संस्थेच्या विकारावर परिणाम कारक

## राजगिरा



- प्रथिनांचा चांगला स्रोत
- कॅल्शियम,लोह,पोटाशियाम , झिंक मुल्द्रव्याने भरपूर
- पचन संस्था सुद्रुढ बनवते
- त्वचा व केसाच्या आरोग्यास उपयुक्त

## सावा



- लीनोलिक,पल्मातिक,ओलिक acid चा स्रोत
- रक्तदाब व मधुमेह वर गुणकारी
- आतड्याच्या आजारावर परीनामारक

## वरई



- ग्लुटन मुक्त, मंगनीज ने समृध्द
- हृदय विकाराकरिता उपयुक्त
- रक्तातील मेदाचे प्रमाण नियंत्रित करते
- स्तनांचे कर्क रोगावर गुणकारी

**(स्रोत: IIMR , हैदराबाद)**

# जागतिक दृष्टीक्षेप -पौष्टिक तृणधान्य

INTERNATIONAL YEAR OF MILLETS 2023

## जगातील विभागानुसार पौष्टिक तृणधान्य क्षेत्र व उत्पादन (२०१९)

| विभाग | क्षेत्र(लाख हे.) | उत्पादन(लाख टन) |
|---|---|---|
| आफ्रिका | ४८९ | ४२३ |
| अमेरिका | ५३ | १९३ |
| आशिया | १६२ | २१५ |
| युरोप | ८ | २० |
| ऑस्ट्रेलिया व न्यूझिलंड | ६ | १२ |
| भारत | १३८ | १७३ |
| **एकूण जग** | **७१८** | **८६३** |

- भारतात १७० लाख मे.टनापेक्षा अधिक उत्पादन होते
- जे आशियातील ८०% आणि जागतिक उत्पादनाच्या २०% आहे.
- जागतिक सरासरी उत्पन्न : १२२९ किलो/हे. भारत:१२३९ ककिलो/हे.

Welcome To All Delegates
For G20 Summit
In Pune, Maharashtra

G20 भारत 2023 INDIA

INTERNATIONAL YEAR OF MILLETS 2023


INTERNATIONAL YEAR OF MILLETS 2023



GOVT. OF INDIA
DEPARTMENT OF AGRICULTURE
GOVT. OF MAHARASHTRA


वसुधैव कुटुम्बकम्
ONE EARTH • ONE FAMILY • ONE FUTURE

# पौष्टिक तृणधान्याखालील क्षेत्र
## (क्षेत्र “०००” हे.)




# पौष्टिक तृणधान्याखालील उत्पादन

(उत्पादन “०००” टन.)




# पौष्टिक तृणधान्याखालील उत्पादकता
## (उत्पादकता कि/हे.)




# जिल्हानिहाय ज्वारी (एकूण) पिकाखालील सरासरी क्षेत्र


(२०१६-१७ ते २०२०-२१) (क्षेत्र “००” हे.)




# जिल्हानिहाय बाजरी (एकूण) पिकाखालील सरासरी क्षेत्र
# (२०१६-१७ ते २०२०-२१) (क्षेत्र “००” हे.)



# जिल्हानिहाय रागी / नाचणी पिकाखालील सरासरी क्षेत्र
# (२०१६-१७ ते २०२०-२१) (क्षेत्र “००” हे.)



# जिल्हानिहाय इतर पौष्टिक तृणधान्य (एकूण) पिकाखालील सरासरी क्षेत्र (२०१६-१७ ते २०२०-२१) (क्षेत्र “००” हे.)



# पिकांखालील मुख्य १० जिल्हे व त्यांचे क्षेत्र
## (क्षेत्र : लाख हेक्टरमध्ये)

| पिके | मुख्य १० जिल्हे |
|---|---|
| ज्वारी | सोलापूर (३.१८), अहमदनगर (२.६८), उस्मानाबाद (१.८९), बीड (१.७९), सातारा (१.५७), सांगली (१.३६), पुणे (१.३५), परभणी (१.२०), जालना (०.८८), जळगाव (०.८६) |
| बाजरी | अहमदनगर (१.५२), नाशिक (१.१४), बीड (०.७३), सातारा (०.६१), धुळे (०.५८), सांगली (०.५४), पुणे (०.५२), सोलापूर (०.४०), औरंगाबाद (०.३७), जळगाव (०.२२) |
| रागी | नाशिक (०.१९), कोल्हापूर (०.१७), पालघर (०.१२), रत्नागिरी (०.१०), सातारा (०.०५), रायगड (०.०३), पुणे (०.०३), ठाणे (०.०२), सिंधुदुर्ग (०.०२) |
| एकूण इतर तृणधान्य | अहमदनगर (०.१७), नाशिक (०.१०), पालघर (०.०८), औरंगाबाद (०.०५), परभणी (०.०४), जालना (०.०४), धुळे (०.०२) |

दिव्य मराठी उस्मानाबाद जिल्हा 13-01-2023

**यंदा शेतकऱ्यांना आशा • तालुक्यात २६ हजार ३४२ हेक्टर क्षेत्रावर ज्वारीची पेरणी**

## भूमच्या ज्वारीला चांगले दिवस येणार !

**चालू 2023 हे आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष**

आबासाहेब बोराडे | भूम

भरडधान्याचे आरोग्यासाठीचे पारंपरिक महत्व आहे,त्यामुळेच त्याला आता पौष्टिक तृणधान्य म्हणून ओळखले जाते.ज्वारी, बाजरी,नाचणी,वरई,राळा , कोडो, कुटकी,सावा,राजगिरा ही पौष्टिक तृणधान्य काळाच्या ओघात मागे पडली.या पिकांच्या उत्पादन, उत्पन्न,आहार यात वाढ करण्याच्या उद्देशाने यंदाचे २०२३ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष' म्हणून साजरे केले जात आहे.यामुळे या नविन वर्षात भूम तालुक्यातील ज्वारीला नक्कीच मागणी वाढेल व ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांना चांगले दिवस येण्याची आशा निर्माण झाली आहे.



भूम तालुका हा ज्वारीचे कोठार अशी ओळख असलेल्या तालुक्यातील पांढरी शुभ्र ज्युट,मालदांडी,दगडी व माळ दगड अशा पाणीदार व चवदार ज्वारी म्हणून या भागातील ज्वारीला मुबंई, पुणे, कोल्हापूर, सोलापूर येथे मोठ्या प्रमाणात मागणी असते. तालुक्यात रब्बी हंगामामध्ये कोरडवाहू पद्धतीने ज्वारी मोठ्या प्रमाणावर घेतली जाते. देशी वाणास शेतकऱ्यांची पसंती,पारंपरिक लागवड पद्धती, डोंगराळ भौगोलिक परिस्थिती व हलक्या जमिनीवर लागवड, रासायनिक खतांचा व औषधांचा अत्यल्प वापर या वैशिष्टांमुळे या भागातील ज्वारी खाण्यास रुचकर लागते व राज्यात प्रसिद्ध आहे.पूर्वी मोठ्या प्रमाणावर ज्वारीची पेरणी होत होती,परंतू अलीकडे ज्वारी काढण्यास मजुरांची टंचाई, काढणीसाठी वाढलेला खर्च, खर्चाच्या तुलनेत मिळणारे कमी उत्पन्न यामुळे पर्यायी पिकांकडे शेतकरी वळले आहेत. तालुक्यात २६ हजार ३४२ हेक्टर क्षेत्रावर ज्वारीची पेरणी करण्यात आली आहे.गेल्या दोन वर्षात चांगला पाऊस, पाणीसाठा झाला आहे तसेच तालुक्यातील मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांकडे असलेल्या पशुधनाला चाऱ्यासाठी रब्बी हंगामात शेतकरी ज्वारी हेच प्रमुख पीक घेत आहेत.

अलीकडे शेतकरी ज्वारीसाठी तुषारसिंचनाचा वापर करत आहेत, स्थानिक वाणासोबतच सुधारित वाणाची सुद्धा पेरणी करत आहेत.काही शेतकऱ्यांनी तर ठिबक सिंचनावर ज्वारी पीक घेऊन भरघोस उत्पादन घेत आहेत.पौष्टिक तृणधान्य वर्ष साजरे करताना शेत तिथे पौष्टिक तृणधान्य,कार्यशाळा, कृषी महोत्सव,पाक कला स्पर्धा, आहारतज्ञांचे व्याख्यान,पौष्टिक तृणधान्य विशेष महिना, बॅनर याद्वारे माहिती,प्रक्रिया उद्योग व एकंदरीत भौगोलिक परिस्थिती व हंगामानुसार पौष्टिक तृणधान्याचे महत्व पटवून देण्यासाठी विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. याचा फायदा शेतकऱ्याला देण्यासाठी प्रयत्न आहेत.

*आरोग्यदायी फायद्यामुळे भाकरी सोबतच ज्वारीच्या उपपदार्थांना देखील मागणी वाढत आहे. या अनुषंगाने प्रक्रिया उद्योगास सुशिक्षित तरुणांना मोठी संधी आहे. ज्वारीचे क्लिनिंग ग्रेडिंग करून शहरातील मागणीनुसार पॅकिंग करून पुरवठा केल्यास जास्तीचा दर मिळेल. भौगोलिक मानांकन, मध्यान्ह भोजनात समावेश, हमीभाव यासारखे धोरणात्मक निर्णय झाल्यास नक्कीच भूमच्या ज्वारीचे व पर्यायाने शेतकऱ्यांचे अर्थकारण बदलेल. -*
***निखील रायकर**, कृषि मंडळ अधिकारी.*

*मी जर वर्षी मोठ्या प्रमाणात रब्बी हंगामातील ज्वारीची पेरणी करत असतो परंतु ज्वारी काढणीस मजूर मिळत नसल्याने व ज्वारीला दरही कमी मिळत असल्याने ज्वारीची पेरणी कमी केली आहे. -*
***अभिजीत हुके पाटील**, शेतकरी.*

# पौष्टिकतृण धान्य विकासासाठी करण्यात आलेली कार्यवाही

- ✓ २०१८ साली राष्ट्रीय पौष्टिकतृण धान्य वर्ष साजरे करण्यात आले.
- ✓ त्या निमित्ताने पुणे येथे राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन
- ✓ राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियाना अंतर्गत पौष्टिकतृण धान्य विकास कार्यक्रम स्वतंत्र पणे राबवण्यास सुरवात.
- ✓ सन २०२२-२३ या वर्षात मागील वर्षाच्या तुलनेत ६८ कोटी वरून १०३ कोटी इतकी वाढीव तरतूद करण्यात आली.
- ✓ "शेत तिथे पौष्टिकतृण धान्य" मोहिमेची खरिपा मध्ये सुरवात
- ✓ कृषी संजीवनी मोहीम अंतर्गत २६ जून २०२२ रोजी पौष्टिकतृण धान्य दिवस निमित्ताने विविध कार्यक्रम
- ✓ PMFME अंतर्गत १४५ पौष्टिकतृण धान्य प्रक्रिया प्रकल्पांना सुरवात
- ✓ ODOP अंतर्गत पौष्टिकतृण धान्य पिकांचे ती जिल्ह्यांचा समावेश (सोलापूर-ज्वारी. नंदुरबार-बाजरी, ठाणे  नाचणी)

# पौष्टिक तृणधान्य विकासाची सप्तसूत्री

- उत्पादन व उत्पादकता वाढ
- पोषण मूल्य व आरोग्य विषयक फायदे
- मूल्यवर्धन ,प्रक्रिया व पाककृती विकास
- नव उद्योगातून व्यावसायिक दृष्टीकोन  वाढवणे
- प्रचार प्रसिद्धी तून जनजागृती निर्माण करणे
- निर्यात वृद्धी
- धोरणात्मक निर्णयातून अंमलबजावणी




पुढारी



नाशिक : राज्य सरकारचा कृषी विभाग आणि कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) यांच्या संयुक्त विद्यमाने होत असलेल्या कृषी महोत्सवाच्या पूर्व संध्येला पूर्वदिनी काढण्यात आलेली दुचाकी रॅली.

## आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्षानिमित्त बाइक रॅली

■ कृषी महोत्सवाबाबत जनजागृती

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

राज्य सरकारचा कृषी विभाग आणि कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) यांच्या संयुक्त विद्यमाने आजपासून (दि. ६) गंगापूर रोडवरील पूर्वदिनी मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षानिमित्त 'तृणधान्य पिकांना प्रोत्साहन' अशी संकल्पना या महोत्सवासाठी घेण्यात आली आहे. सोमवारी प्रादेशिक कृषी विस्तार व व्यवस्थापन प्रशिक्षण संस्थेच्या आवारातून या रॅलीला सुरुवात झाली.

पार पडला. वाघ यांनी रॅलीस हिरवा झेंडा दाखविल्यानंतर रॅलीस सुरुवात झाली. पौष्टिक तृणधान्य, फळे आणि भाजीपाला यांचे महत्त्व दर्शविणाऱ्या घोषवाक्यांचे फलक रॅलीमध्ये दर्शविण्यात आले होते.

रॅलीसाठी भगर असोसिएशनचे सहकार्य लाभले. असोसिएशनचे महेंद्र छोरिया, उमेश वैष्णव, नटवर बोरा, पारस साकला, पंकज चोरडिया, सुनील चोरडिया, विभागीय कृषी सहसंचालक मोहन वाघ, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी विवेक सोनवणे, आत्माचे प्रकल्प संचालक राजेंद्र निकम, नोडल अधिकारी सुनील वानखेडे आदी मान्यवर सहभागी झाले होते.

# “राज्यस्तरीय कृती दल”

- “आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष २०२३”राज्यात साजरे करण्यासाठी **मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सुकाणू समिती**ची स्थापना.

- त्याचबरोबर मा. आयुक्त कृषि यांचे अध्यक्षतेखाली **राज्यस्तरीय कृती दलाचे** गठन.

## तृणधान्याचा आहारात वापर करा : योगतज्ज्ञ सीमा पाटील

### आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्याबाबत बैठक

**सकाळ वृत्तसेवा**

जळगाव, ता. २८ : योगाबरोबरच तृणधान्याचा आहार घ्यावा. योगक्रिया आणि आहारात तृणधान्याची सांगड घातल्यास निरोगी आयुष्य अतिशय कमी खर्चात सर्वसामान्य जनतेला उपभोगता येईल. तृणधान्याची महत्त्वाची जाणीव करून दिल्यास कुटुंबाच्या आहारात तृणधान्याचा समावेश आपोआप होईल. आज ५० टक्क्यांपेक्षा मधुमेह, बद्धकोष्टता, हृदयरोग यांची रुग्णसंख्या कमी होण्यास मदत होईल, असा विश्वास आंतरराष्ट्रीय योग तज्ज्ञ सीमा पाटील यांनी येथे व्यक्त केला.

२०२३ आंतरराष्ट्रीय पौष्टीक तृणधान्य वर्षे साजरे करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी (ता. २८) बैठक झाली. जिल्हाधिकारी अमन मित्तल अध्यक्षस्थानी होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पंकज आशिया, आयुक्त देविदास पवार, विषय विशेषज्ञ अतुल पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संभाजी ठाकूर, जिल्हा कृषी उपसंचालक अनिल भोकरे, आहार तज्ज्ञ डॉ. अनंत पाटील आदी उपस्थित होते.

श्री. भोकरे यांनी प्रास्ताविकात आंतरराष्ट्रीय पौष्टीक तृणधान्य वर्षे साजरे करताना विविध विभागांचा असलेला सहभागाबाबत अवगत केले. तृणधान्यपासून बनवित असलेल्या उपपदार्थांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. आहार तज्ञ डॉ. पाटील यांनी आहारातील तृणधान्याचे महत्त्व समजवून सांगितले.

**वसतिगृहातील आहारात तृणधान्याचा सामावेश**

जिल्हाधिकारी मित्तल यांनी धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने शासकीय वसतिगृहामध्ये तृणधान्यापासून बनविलेल्या पदार्थांच्या आहारात समाविष्ट करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या. तृणधान्याच्या उपपदार्थांबाबत जनजागृती करावी. जिल्हा प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी निबंध, वकृत्व स्पर्धा, तसेच पोष्टीक तृणधान्यापासून पदार्थ बनवून आणून शाळेतील आनंदामेळा उपक्रमात याचा समाविष्ट करावा. विविध शासकीय विभागाच्या कार्यक्रम व आढावा बैठकीत अल्पोहार व भोजनात तृणधान्य पदार्थांचा समावेश करण्यात यावा. शालेय पोषण आहार व शिवभोजन थाळीत तृणधान्य उपपदार्थ समावेश करावा. तृणधान्याच सेवनामुळे फायदा झालेल्या विवि रुग्ण यांच्या यशोगाथा बनवा.



जळगाव : जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी झालेल्या बैठकीत तृणधान्याची माहिती घेताना जिल्हाधिका अमन मित्तल, डॉ. पंकज आशिया, आयुक्त देवीदास पवार, संभाजी ठाकूर, अनिल भोकरे आदी.

## राज्यस्तरीय सुकाणू समिती चे कार्य

- पौष्टीक तृणधान्य पिकांचे क्षेत्र व उत्पादनात वाढ करणे.
- पौष्टीक तृणधान्य पिकांची मूल्यवर्धित उत्पादने तयार करणे.
- पौष्टीक तृणधान्य पिकांचा लोकांच्या आहारातील वापर वाढविणे.
- पौष्टीक तृणधान्याचे आहारविषयक महत्व पटवून देण्यासाठी प्रचार प्रसिद्धी करणे.
- उत्पादन व आहारातील वापर वाढ करण्यासाठी विविध उपक्रम राबविणे.
- पौष्टीक तृणधान्य पिकांचा शासनाचे विविध विभागांच्या योजनामध्ये समावेश करणे.

# “आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष - २०२३”
# “राज्यस्तरीय सुकाणू समिती ”

| अ.क्र. | विभाग | पदनाम |
|---|---|---|
| १ | मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य | **अध्यक्ष** |
| २ | अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग (नवि-१) | सदस्य |
| ३ | अपर मुख्य सचिव, (सहकार व पणन) सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग | सदस्य |
| ४ | अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग | सदस्य |
| ५ | अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग | सदस्य |
| ६ | अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग | सदस्य |
| ७ | अपर मुख्य सचिव, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| ८ | प्रधान सचिव, माहिती व जनसंपर्क विभाग | सदस्य |
| ९ | प्रधान सचिव, (उद्योग) उद्योग, उर्जा व कामगार विभाग | सदस्य |
| १० | प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग | सदस्य |
| ११ | प्रधान सचिव (कृषि) कृषि पशुसंवर्धन, पदुम विभाग | सदस्य |
| १२ | प्रधान सचिव, पर्यटन विभाग | सदस्य |
| १३ | सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग | सदस्य |
| १४ | सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| १५ | अतिरिक्त मुख्य सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग | सदस्य |
| १६ | आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय ,पुणे | सदस्य |
| १७ | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान | सदस्य |
| १८ | व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ | सदस्य |
| १९ | व्यवस्थापकीय संचालक, मार्कफेड | सदस्य |
| २० | व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ | सदस्य |
| २१ | सह सचिव (अर्थसंकल्प) कृषी व पदुम विभाग | **सदस्य सचिव** |

# कृषि विभागाचा कार्यक्रम

- पौष्टिक तृणधान्य पिकांचे क्षेत्र व उत्पादन वाढीवर भर
- आहारातील वापर वाढविण्याकरिता प्रचार व प्रसिद्धी करणे
- फूड फेस्टिवल व आरोग्यविषयक महत्त्वा याची जनजागृती
- कृषि संजीवनी सप्ताहत सुधारीत तंत्रज्ञानाबाबत प्रचार प्रसिद्धी
- सामाजिक व स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने प्रचार व प्रसार
- भारतीय संस्कृतीमधील पिकाचे महत्त्व विचारात घेवून **“पौष्टिक तृणधान्य विशेष महिना”** संकल्पना
- **“शेत तिथे पौष्टिक तृणधान्य”**मोहिमेअंतर्गत प्रत्येक शेतात पौष्टिक तृणधान्य घेण्यासाठी बियाण्याच्या किटचे वाटप

## मकरसंक्रांती सणाचा दिवस पौष्टिक तृणधान्य दिन म्हणून साजरा करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

देशोन्नती वृत्तसंकलन...

**चंद्रपूर** : संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०२३ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष' म्हणून घोषित ... हाती घेण्यात येणार आहेत. आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष २०२३ अंतर्गत मकरसंक्राती हा सणाचा दिवस दरवर्षी राज्यामध्ये ... यशोगाथा, मुलाखती, तृणधान्य पिकांपासून बनवण्यात येणारे विविध उपपदार्थ यांची माहिती देणे यासाठी प्रगतीशील शेतकरी ...

अॅग्रोवन

## जिल्हा कृषी महोत्सवात रंगली पाककृती स्पर्धा, परिसंवाद

### पौष्टिक तृणधान्य वर्ष : स्पर्धेत २० महिला व शेतकरी गट सहभागी

ॲग्रोवन वृत्तसेवा

नाशिक : कृषी विभाग व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा कृषी महोत्सवाचे आयोजन ६ ते १० डिसेंबर या कालावधीत शहरातील डोंगरे वसतिगृह मैदानावर करण्यात आले आहे. या महोत्सवात दुसऱ्या दिवशी बुधवारी (ता. ७) आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षानिमित्त तृणधान्य महत्त्व अधोरेखित करण्यासाठी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी तज्ज्ञ व उपस्थित मान्यवरांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. या वेळी तृणधान्य पाककृतींची स्पर्धा रंगली.

या वेळी नाचणी पैदासकार योगेश बण यांनी तृणधान्य लागवड तंत्रज्ञान व भविष्यातील संधी, महेश लोंढे यांनी लघु उद्योजकासाठी भरडधान्य व्यवसायातील संधी, कळसूबाई शेतकरी उत्पादक कंपनीच्या ...



**स्पर्धेचे विजेते**

- प्रथम क्रमांक-सुनीता विनायक भडांगे, सुरगाणा,
- द्वितीय क्रमांक-वैशाली विजय लांबे, नाशिक,
- तृतीय क्रमांक-चैतन्य दीप महिला बचत गट, कळवण

बाजरीचे शेंगुळे, ज्वारीचे वरगुडे, भगरची खीर, नाचणी व ज्वारीची शेव, ज्वारी नागलीची शंकरपाळी असे विविध पदार्थ तयार केले होते.

पाककलेचे परीक्षक म्हणून हिमाणी पुरी, नीलिमा जोरवर, कृषी विज्ञान केंद्र नाशिकच्या गृह विज्ञान शाखेच्या विषय विशेषज्ञ अर्चना देशमुख यांनी कामकाज पाहिले. विजेत्यांना व सर्व सहभागी महिला गटांना प्रकल्प संचालक (आत्मा) राजेंद्र निकम, स्मार्ट ...



# कृषि विभागाचा कार्यक्रम

- माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये संभाजीनगर येथे **राज्यस्तरीय कार्यशाळेचे** नियोजन
- प्रत्येक जिल्ह्यात **“मिलेट दौड”** चे आयोजन.
- रा.कृ.वि.यो. अंतर्गत **“महाराष्ट्र मिलेट मिशन”** या विशेष अभियानाची अंमलबजावणी
- “पौष्टिक तृणधाण्याची ओळख” संकल्पनेअंतर्गत तृणधान्य पाककृती पुस्तकांचे प्रकाशन
- PMFME, CM Food Processing, SMART, PoCRA अंतर्गत उत्पादन वाढ, प्रक्रिया, मूल्यवर्धन व बाजारपेठ उपलब्धता भर
- राज्यात उत्पादन वाढीसाठी भरीव कामगिरी करणाऱ्या विविध क्षेत्रातील सत्कार मूर्तीचा गौरव समारंभ कार्यक्रमाचे आयोजन
- केंद्र शासनाने फेब्रुवारी महिना हा महाराष्ट्र राज्य करिता समर्पित महिना म्हणून कार्यक्रम घेण्यासाठी ठरवून दिला आहे.

लोकमत

आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत शेतकरी गटांना मार्गदर्शन

## कार्यशाळेतून पौष्टिक तृणधान्याची माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

बीड : आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत पौष्टिक तृणधान्य दिनाचे औचित्य साधून कृषी पायाभूत सुविधा निधी योजना कृती संगम कार्यशाळेत तज्ज्ञ अधिकाऱ्यांनी यंत्रणेतील कर्मचारी व शेतकरी गटांना मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र शासन कृषी विभाग व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा



पौष्टिक तृणधान्य दिनानिमित्त कार्यशाळेत कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेच्या घडीपत्रिकेचे

### प्रदर्शनात तृणधान्याची थाळी

कार्यशाळेनिमित्त प्रदर्शनात पौष्टिक तृणधान्य व त्याचे पदार्थ, तृणधान्यांची पाककृती तसेच कृषी पायाभूत सुविधांची माहिती देणारे फलक होते. उपस्थितांनी पौष्टिक तृणधान्याची थाळीचा आस्वाद घेण्यासाठी नियोजन केले होते. यावेळी पौष्टिक तृणधान्याचे महत्त्व

## ज्वारी, बाजरी, नागलीसह तृणधान्यांचा होणार जागर!



चला, अन्नदात्याचा उत्सव साजरा करू या

## पोषणमूल्यासाठी तृणधान्यांच्या वापराबाबत जागृती

प्रतिनिधी | उमरगा



गुंजोटीत शेतकरी महिला गट तृणधान्ययुक्त उत्पादित वस्तूंची दशरथ तांभाळे यांनी पाहणी केली.

### तृणधान्यापासून ब्रेड, बिस्किट

# IYOM अंतर्गत : माहे-फेब्रुवारी २०२३ मध्ये आयोजित करावयाचे विशिष्ट उपक्रम

| अ.क्र. | दिनांक | नियोजित उपक्रम | शेरा |
|---|---|---|---|
| १ | ३१ जानेवारी ते १ फेब्रूवारी | मंत्रालय ,मुंबई येथे महाराष्ट्र मिलेट मिशन प्रदर्शन. | महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांचे हस्ते महाराष्ट्र मिलेट मिशन चे उद्घाटन. |
| ४ | १ ते २८ फेब्रुवारी | प्रत्येक जिल्ह्यात मिलेट दौड | सर्व जिल्ह्यांमध्ये. |
| ५ | १ ला आठवडा | उन्हाळी बाजरी प्रात्यक्षिकांचे आयोजन. | १००००हे.पेक्षा जास्त क्षेत्रावर. |
| ६ | १ ला आठवडा | मिलेट ऑफ द मन्थ: ज्वारी : "हुरडा" सारख्या स्थानिक ज्वारी उत्पादनाचा खाद्य महोत्सव आयोजित करणे. | गाव पातळीवर कृषि सहाय्यकांनी करावयाचे २ दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन |
| ८ | ७ फेब्रुवारी | शेतकरी मासिक मार्फत पौष्टिक तृणधाण्याच्या विशेष मासिकाचे प्रकाशन. (साधारणतः १.५० लाख प्रति) | शेतकरी व नागरिकांसाठी. |
| ९ | ९ ते १२ फेब्रुवारी | पुणे येथे पौष्टिक तृणधान्याचे राज्यस्तरीय कृषि महोत्सव व प्रदर्शनाचे आयोजन.(खाद्य महोत्सव/मिलेट जत्रा) | राज्यस्तरीय कृषि महोत्सवाचे उद्घाटन पुण्याचे पालकमंत्री यांचे हस्ते (MCCIA, Pune यांच्या सहयोगाने). |

# IYOM अंतर्गत : माहे-फेब्रुवारी २०२३ मध्ये आयोजित करावयाचे विशिष्ट उपक्रम

| अ.क्र. | दिनांक | नियोजित उपक्रम | शेरा |
|---|---|---|---|
| ११ | २ रा आठवडा | "Know your Millet"मोहिमेंतर्गत मिलेट बुक चे प्रकाशन | मा. प्रधान सचिव कृषी यांचे शुभ हस्ते प्रकाशन |
| १२ | २ रा आठवडा | ज्वारी पिक प्रात्यक्षिक भेटी व शेतकऱ्यांना मार्गदर्शन | कृषी अधिकाऱ्यांमार्फत |
| १३ | २ रा व ३ रा आठवडा | ज्वारी पिक कापणी प्रयोगाला भेटी | कृषी अधिकाऱ्यांमार्फत |
| १४ | २ रा व ३ रा आठवडा | कृषी विद्यापीठे/KVKs/संशोधन केंद्र | शेतकऱ्यांसाठी |
| १६ | १ ते २८ फेब्रुवारी | नंदुरबार, भंडारा, हिंगोली, सिंधुदुर्ग, ठाणे सांगली, कोल्हापूर, पालघर,वाशिम, धुळे, पुणे येथे जिल्हास्तरीय कृषि महोत्सवाचे आयोजन. | स्थानिक मा.आमदार/खासदार यांचे हस्ते जिल्हास्तरीय कृषि महोत्सवाचे उद्घाटन. |
| २२ | २६ फेब्रुवारी | पुणे येथे पौष्टिक तृणधान्य जनजागृती कार्यक्रम, पाककृती स्पर्धा आणि आहारतज्ञ व्याख्याने. | कृषी विभाग व इस्कॉन यांचे समन्वयाने |

# वर्षातील नियोजीत उपक्रम

- पौष्टिक तृणधान्य कार्यशाळेचे आयोजन
- आहारतज्ञांसमवेत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन
- “पौष्टिक तृणधाण्याची ओळख” पुस्तकांचे प्रकाशन
- पाककृती स्पर्धांचे आयोजन
- रोड शोज / प्रभातफेरी
- कृषी महोत्सवाचे आयोजन
- “मूल्य साखळी विकसनासाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन
- प्रक्रीयाधारकांसाठी प्रशिक्षण आयोजन
- खरेदीदार -विक्रेता संमेलन
- हॉटेल असोशिएशन, शेफ असोशिएशन सोबत कार्यक्रम
- शाळांमध्ये आहारविषयक महत्वाबाबत व्याख्यान मोहीम आणि चित्रकला स्पर्धा





# "पौष्टिक तृणधान्य विशेष महिना संकल्पना"
## (MILLET OF THE MONTH)

Azadi Ka Amrit Mahotsav

INTERNATIONAL YEAR OF MILLETS

१) जानेवारी महिना : मकरसंक्रांत – भोगी : बाजरी

२) फेब्रुवारी महिना : हुरडा पार्टी : ज्वारी

३) ऑगस्ट महिना : श्रावण मास : राजगिरा

४) सप्टेंबर महिना : पितृपक्ष : राळा

५) ऑक्टोबर महिना : नवरात्री महोत्सव : वरई

६) डिसेंबर महिना : नाचणी / रागी

सकाळ

मकर संक्रांतीनिमित्त प्रत्येक गावात होणार बाजरी महोत्सव

# पौष्टिक तृणधान्ये खा...

बदलत्या जीवनशैलीमुळे ऐन तारुण्यातच आता विविध आजारांना सामोरे जावे लागते आहे. या पार्श्वभूमीवर यंदाचे वर्ष पौष्टिक तृणधान्य (भरडधान्य) वर्ष म्हणून जगभर साजरे होणार आहे. राज्यातही भरडधान्याचे आरोग्यदायी महत्त्व आणि फायद्यांबाबत विविध जनजागृतीपर उपक्रम होणार आहेत. त्याचा कृती आराखडा निश्चित झाला असून, जिल्हानिहाय विविध कार्यक्रम होणार आहेत. यंदापासून मकर संक्रांती-भोगी हा दिवस राज्यात पौष्टिक तृणधान्य दिवस म्हणून साजरा केला जाईल. राज्यातील प्रत्येक गावात दोनदिवसीय बाजरी महोत्सव भरणार आहे.





बिग स्टोरी
संभाजी गंडमाळे

दृष्टिक्षेपात मिशन...
- भरडधान्य मिशनसाठी राज्य शासन खर्च करणार : २०० कोटी
- पन्नास कोटी व स्मार्ट प्रकल्पाच्या माध्यमातून अन्न प्रक्रिया उभारले जाणारे उद्योग : २००
- भरडधान्यावर व्याख्याने घेणाऱ्या ग्रामपंचायती : १० हजार
- भरडधान्यावरील विशेषांकाच्या प्रसिद्ध होणाऱ्या प्रती : दीड लाख
- भरडधान्य कापणी स्पर्धांची ठिकाणे : एक हजार

सर्वाधिक पोषणमूल्ये

लवकरच विशेषांक

**महाराष्ट्र शासनाचा भोगी /संक्रांत हा दिवस "पौष्टिक तृणधान्य दिवस" प्रत्येक वर्षी साजरा करण्याचा निर्णय**

लोकमत

जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन : कोरोनापश्चात तृणधान्याचे पदार्थ खाल्लेच पाहिजेत

## भोगीमुळे जानेवारी महिना 'बाजरी'चा; हार्टअॅटॅकसह इतर आजारांचा त्रास नाही !

लोकमत न्यूज नेटवर्क



तृणधान्य सेवनाला पूर्वापार महत्त्व..

भारत जगातील प्रमुख देश!



Hello Solapur
Page No. 4 Jan 07, 2023
Powered by: erelego.com

योगिता पाटील , कृषि सहायक , नांदगाव यांनी तयार केलेले पौष्टीक तृणधान्य मिलेट ऑफ द मंथ – बाजरी पिकाचे पौष्टीक महत्त्व सांगणारे चित्र




# यंदा सणावळीला दर महिन्याला पौष्टिक तृणधान्याचे तोरण!

### कृषी विभागाकडून उपक्रम : प्रत्येक सणाला वेगवेगळ्या तृणधान्याची फोडणी

लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : संयुक्त राष्ट्रसंघाने २०२३ हे वर्ष 'पौष्टिक तृणधान्य वर्ष' म्हणून साजरा करायचा निर्णय घेतला आहे. त्या पार्श्वभूमीवर वर्षभरातील प्रत्येक सणावळीला तृणधान्याच्या पौष्टिकतेचा साज चढविण्यासाठी कृषी विभागाने नियोजन केले आहे. त्यादृष्टीने विविध तज्ज्ञांच्या सहभागातून दि. १५ जानेवारीपासून उपक्रम नवनवीन उपक्रम येथील कृषी विभागाच्या वतीने हाती घेण्यात आले आहेत.

'पौष्टिक तृणधान्य वर्ष' या संकल्पनेतील ज्वारी, बाजरी, नाचणी, वरई, राळा, कोडो, कुटकी, सावा, राजगिरा आदी तृणधान्ये पिकांच्या वाढीसह त्यांच्या आहारातील गरजेविषयी महत्त्व पटवून देण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले जाणार आहेत. त्यासाठी महिनावार आणि सणानुसार तृणधान्यांची निवड करण्यात आली आहे.

**सणावळीला तोरण**

मकरसंक्रांती अर्थात भोगीसाठी बाजरीची निवड करण्यात आली आहे. हिवाळ्यात बाजरी शरीरासाठी पोषक आहे.

त्यामुळेच संक्रांतीसाठी बाजरीची निवड करण्यात आली आहे. फेब्रुवारी महिन्यात 'हुरडा'चा आस्वाद घेतला जाणार आहे.

त्यानंतर श्रावणात राजगिरा उपवास पर्वाला पावणार आहे. पितृ पंधरवड्यात राळ्याच्या भाताला महत्त्व आहे.

त्यामुळे सप्टेंबरचा महिना राळा पिकाला समर्पित करण्यात आला आहे. ऑक्टोबरमध्ये नवरात्रीनिमित्त वरई व भगरची निवड करण्यात आली आहे. नोव्हेंबर आणि डिसेंबरमध्ये नाचणीला हाताशी घेऊन सात्त्विकता पेरली जाणार आहे.

त्यासाठी विविध प्रदर्शन, स्पर्धा, प्रबोधनपर फेरी, वर्ग, महिला बचत गटांचे स्टॉल लावण्यात येणार आहेत. त्यातूनच तृणधान्याची आहारातील गरजेविषयी जाणीव करून दिली जाणार आहे.

'पौष्टिक तृणधान्य वर्ष साजरा करण्यासाठी नियोजन झाले आहे. तज्ज्ञांच्या माध्यमातून समाजात तृणधान्याचा प्रचार आणि प्रसार केला जाणार आहे. आहारातील जीवनसत्त्वे जपण्यासाठी हा कार्यक्रम नक्कीच पूरक ठरणार आहे.
-अनिल भोकरे, कृषी उपसंचालक, जळगाव.

Jalgaon Main
Page No. 3 Jan 12, 2023
Powered by: erelego.com

# कार्यक्रमाच्या प्रसिद्धी साठी WEBSITE

## www.mahamillets.org



# संलग्न विभागाकडून राबवायचे कार्यक्रम

❖ **ग्राम विकास विभाग**
- १२००० हेक्टर क्षेत्रावर महिला बचत गटांमार्फत क्षेत्र विस्तार
- IIMR संस्थेमार्फत पौष्टिक तृणधान्यांच्या पाककृतीबाबत बचत गटांना प्रशिक्षण
- ३४ जिल्ह्यांमध्ये मिलेट महोत्सव, पाककृती स्पर्धा व प्रदर्शन
- IIMR चे पाककृतीचे पुस्तक पर्यटन विभागामार्फत पंचतारांकीत /हॉटेल्सना उपलब्ध करुन देणे

❖ **महिला व बाल कल्याण विभाग**
- अंगणवाडी सेविकांमार्फत पालकांमध्ये जागरुकता
- अंगणवाड्यांमध्ये फेब्रुवारी, २३ मध्ये एक आठवडा मुलांना पौष्टीक तृणधान्याचा आहार
- शाळांच्या मध्यान्ह आहार योजनेमध्ये एक दिवस पौष्टीक तृणधान्याचा समावेश

❖ **आदिवासी विकास विभाग**
- आश्रमशाळा व वसतीगृहांमध्ये पौष्टीक तृणधान्याचा समावेश
- न्युक्लीयस बजेट योजनेत नाचणी पिकाच्या साठी अनुदान देणे
- आरोग्य व आहार विषयक महत्वाबाबत जन जागृती

❖ **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
- ४४१ वसतीगृहे , ९० बोर्डींग स्कुल्स, १६०० दिव्यांग शाळा, आणि इतर सेवाभावी संस्था यामधील विद्यार्थ्यांच्या आहारात पौष्टीक तृणधान्याचा समावेश.
- आरोग्य व आहार विषयक महत्व याबाबत जागरुकता.



# संलग्न विभागाकडून राबवायचे कार्यक्रम

## ❖ नगर विकास विभाग

- महानगरपालिका /नगरपालिका क्षेत्रामध्ये होर्डिंग्स, बीलबोर्डस, बॅनर्स इ.द्वारे प्रचार प्रसिद्धी.
- महानगरपालिका/नगरपालिका बजेटमधून ५ टक्के रक्कम बालवाडी व शाळांमध्ये मध्यान्ह आहार योजनेत उपलब्ध करून देणे.

## ❖ सहकार व पणन विभाग

- मार्कफेड मार्फत खरेदी करून अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महिला व बाल विकास विभाग, आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शालेय शिक्षण विभाग यांना उपलब्ध करून देणे.

## ❖ माहिती व जनसंपर्क विभाग

- पौष्टीक तृणधान्याच्या महत्वाविषयी विविध माध्यमांमार्फत प्रचार प्रसिद्धी करावी.
- “पौष्टीक तृणधान्य महिना” म्हणून साजरा करण्यासंदर्भात फेब्रुवारी महिन्यात लोकराज्यचा विशेष अंक प्रसिध्द करणे

## ❖ अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

- शेतकऱ्यांना आधारभूत खरेदी योजनेमध्ये नाचणी (रागी) या पिकास प्रोत्साहनपर बोनस देण्याबाबत प्रस्ताव तयार करणे .

## ❖ शालेय शिक्षण विभाग

- मध्यान्ह भोजन आहार इ. मध्ये पौष्टीक तृणधान्याचा समावेश करणे.
- विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य व आहारविषयक महत्वाबाबत जागरुकता निर्माण करणे.



### ‘मी आठवड्यातून एकदा तरी तृणधान्य खाईन’

व्याधींपासून मुक्तता करण्याचा मूलमंत्र : कण्हेर कार्यक्रमात जागर

कण्हेर : बाळू मोरे

भारतीयांचे प्रमुख अन्न म्हणून तृणधान्य ओळखले जात होते. मात्र, काही वर्षांपासून त्यात घट होत आहे. आपण आपले धान्य विसरून पाश्चात्त्य धान्याच्या मागे लागलो आणि विविध व्याधींना बळी पडलो. आता याच व्याधींपासून मुक्तता हवी असेल तर तृणधान्याशिवाय पर्याय नाही, हे वास्तव समोर आले आहे. म्हणूनच 'मी आठवड्यातून एकदा तरी तृणधान्य खाईन,' अशी प्रतिज्ञा

कण्हेरमध्ये बचत गटातील महिलांनी पौष्टिक तृणधान्याचा आहारात समावेश करण्याचा निर्धार केला.

सध्या 'फास्ट फूड'चा जमाना असल्याने तृणधान्याला महत्त्व दिले जात नाही. भारतात तृणधान्याच्या लागवडीखालील क्षेत्रांत सातत्याने

शासनाच्या कृषी विभागाने कण्हेर (ता. सातारा) येथ महिला बचतगटांचा कार्यक्रम घेतला. यामध्ये महिलांना पौष्टिक तृणधान्य

समावेश करण्याचा निर्धार केला. सरकार जेव्हा काही करील, तेव्हा करील; परंतु सामान्य नागरिकांनीही आता पुढे येण्याची गरज आहे. 'मी आठवड्यातून एकदा तरी तृणधान्य खाईन,' अशी प्रतिज्ञा केली पाहिजे, तरच तृणधान्य वाचून पर्यायाने माणूसही वाचेल, असे कृषी सहाय्यक सचिन साळे यांनी सांगितले. या कार्यक्रमात तालुका कृषी अधिकारी हरिश्चंद्र धुमाळ यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी कण्हेर महिला बचत गटातील बँक सखी



# संलग्न विभागाकडून राबवायचे कार्यक्रम

### ❖ पर्यटन विभाग

- Responsible Tourism, “शिवनेरी फेस्टीवल” अंतर्गत पौष्टिक तृणधान्याची प्रचार प्रसिध्दी .
- पंचतारांकित/इतर सर्व हॉटेल्समध्ये पौष्टीक तृणधान्याचे विविध पदार्थ उपलब्ध करून देणे.
- आरोग्यविषयक महत्वाबाबतचे फलक हॉटेल्सच्या दर्शनी भागात लावण्याबाबत कार्यवाही.

### ❖ सामान्य प्रशासन विभाग

- मंत्रालयातील उपहारगृहामध्ये पौष्टीक तृणधान्याचे पदार्थ उपलब्ध करून देणे
- मंत्रालयात विविध स्तरावर आयोजित बैठकामधील अल्पोपहारामध्ये पौष्टीक तृणधान्याच्या पदार्थांचा समावेश करण्याबाबत सूचना निर्गमित करणे.

### ❖ उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि हॉटेल मॅनेजमेंट इन्स्टीट्युट, दादर

- नाविन्यपूर्ण पाककृती विकसित करुन त्याचे पुस्तक प्रसिध्द करणे .
- हॉटेल मॅनेजमेंट इन्स्टीट्युट, दादर मार्फत महीला गटांना पाककृतींचे प्रशिक्षण देणे .
- शेफ-प्रशिक्षणात पाककृती संदर्भात जागरुकता/प्रचार-प्रसार यांचा अंतर्भाव करने

### ❖ अन्न व औषधी द्रव्य प्रशासन संचालयानय

- Eat Right Campaign मध्ये  पौष्टिक तृणधान्याचा समावेश करण्यात यावा.



## 'एमटीडीसी' उपाहारगृहात मिळणार पौष्टिक न्याहरी

### आरोग्यदायी पर्यटनासाठी पुढाकार; तृणधान्याचे पदार्थ उपलब्ध होणार

MAHARASHTRA TOURISM

▸ सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. १५ : संयुक्त राष्ट्रसंघाने हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष' म्हणून घोषित केले आहे. त्यामुळे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून (एमटीडीसी) पर्यटक निवासांत पौष्टिक तृणधान्याचे खाद्यपदार्थ न्याहरीसाठी उपलब्ध करून देण्याबरोबरच पर्यटकांचे पर्यटन आरोग्यादायी घडवून आणण्यासाठी प्रयत्न सुरू केला जाणार आहे.

**वर्षभर घेता येणार स्वाद**

एमटीडीसीच्या सर्व उपाहारगृहांत पौष्टिक तृणधान्य म्हणून ज्वारी, बाजरी, नाचणी, वरई, राळा, राजगिरा पिकांच्या विविध आणि रुचकर पाककृती उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच जनजागृतीसाठी विविध उपक्रम ही राबविण्यात येणार आहेत. पुढील वर्षभर हे पदार्थ पर्यटकांना उपाहारगृहात उपलब्ध करून देण्याचे नियोजन असल्याचे औरंगाबादचे प्रादेशिक व्यवस्थापक दिपक हरणे यांनी सांगितले.

#### काय असणार खासीयत

- निवास आणि उपाहारगृहाच्या दर्शनी भागात पौष्टिक तृणधान्य पदार्थ उपलब्धतेबाबत फलक
- आहारमूल्याबाबत बोधचिन्हासह फलक
- स्थानिक शेतकऱ्यांच्या मदतीने हुरडा पार्टीचे (ज्वारी) आयोजन

“ स्थानिक बचत गट, शेतकऱ्यांमार्फत नाचणीचे वाळलेले खाद्यपदार्थ (पापड, कुरडया, बिस्किट) पर्यटकांसाठी उपलब्ध करून देण्यात येतील. शक्य असलेल्या ठिकाणी स्थानिक अल्प भू-धारक शेतकऱ्यांना महामंडळाच्या पर्यटक निवासात पौष्टिक तृणधान्यांचे प्रदर्शन व विक्रीसाठी स्टॉल उभा करण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे.

— **दीपक हरणे**, प्रादेशिक व्यवस्थापक, औरंगाबाद

#### पर्यटकांसाठी विविध संकल्पना

- राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कृषी विभागाशी समन्वय करून पौष्टिक तृणधान्याबाबत विविध कार्यक्रम राबविणे
- स्थानिक शेत ते थेट पर्यटक अशा संकल्पना राबविणे
- मोकळ्या जागेमध्ये शक्य असेल त्या ठिकाणी पौष्टिक तृणधान्याची लागवड करणे.
- स्थानिक शेतकऱ्यांशी समन्वयाने पर्यटकांची शेत सहल आयोजित करणे, अशा संकल्पना अमलात आणून पर्यटकांचे आरोग्यदायी पर्यटन घडवून आणावे, अशा सूचना एमटीडीसीच्या व्यवस्थापकीय संचालक श्रद्धा जोशी यांनी दिल्या आहेत.

# पौष्टिक तृणधान्य इतर राज्यातील कार्यक्रम

Azadi Ka Amrit Mahotsav

INTERNATIONAL YEAR OF MILLETS 2023

| | |
|---|---|
| ओरिसा | • ओरिसा मिलेट मिशन- Farm to Plate, संकल्पना<br>• १५ जिल्ह्यात मिलेट चे पुनरुज्जीवन.<br>• नाचणीचा सार्वजनिक वितरण व्यवस्थेत समावेश,<br>• महिला उद्योजकांवर लक्ष केंद्रित करून मूल्य साखळी विकास |
| कर्नाटक | • भविष्यातील धान्य या संकल्पना वर आधारित कार्यक्रम<br>• रु १०००० प्रती हेक्टर लागवडीवर प्रोत्साहन अनुदान<br>• मिलेट उत्पादनाला सेंद्रिय शेतीत प्राधान्य<br>• राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय प्रदर्शना मार्फत निर्यातीस प्रोत्साहन<br>• नाचणी आधारभूत किंमतीने खरेदी करण्यात येते<br>• सार्वजनिक वितरण प्रणालीमध्ये प्रती व्यक्ती प्रती महिना २ किलो नाचणी वितरीण |
| तामिळनाडू | • कोरडवाहू शेती कार्यक्रम अंतर्गत मिलेटला प्राधान्य<br>• मिलेट मिशन कार्यक्रम |
| हरयाणा | • भात पिका ऐवजी बाजरी पिकाला प्राधान्य |
| उत्तर प्रदेश | • राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियाना अंतर्गत बुंदेलखंड भागात मिलेट ला प्राधान्य |
| गुजरात | • किसान मेळावा व प्रचार प्रसिद्धी मार्फत प्रोत्साहन . |
| तेलंगाना | • मिलेट आधारित शेतकरी उत्पादक कंपन्याना प्रोत्साहन |

# “महाराष्ट्र मिलेट मिशन” - २०० कोटी तरतूद

INTERNATIONAL YEAR OF MILLETS 2023

Azadi Ka Amrit Mahotsav

## राष्ट्रीय अन्न व पोषण सुरक्षा अभियान

### तरतूद रु. १०३ कोटी

क्षेत्र व उत्पादन वाढ, सुधारीत लागवड

तंत्रज्ञान प्रसार

कृषी यांत्रीकिकरण

लोकशिवार

१० मंगळवार, १ नोव्हेंबर २०२२ — शेती समजून घेताना... — लोकसत्ता

## ज्वारी उत्पादन वाढीचा संकल्प!

रब्बी ज्वारीचे उत्पादन वाढीसाठी राज्य शासनाने यंदा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे . याअंतर्गत सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यात १० हजार हेक्टरवर शाळू उत्पादन वाढीचा संकल्प हाती घेण्यात आला आहे . उत्पादन वाढीसाठी नवीन तंत्रज्ञान संशोधित केले असून याद्वारे हेक्टरी ८० क्विंटलचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे .

दिगंबर शिंदे







## बाजरीचे अनुदानित बियाणे वाटप

वणी (वा.) मौजे दगड पिंपरी येथे आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्ये वर्ष २०२३ निमित्ताने राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत बाजरी पिकाचा प्रकल्प राबविण्यात आला आहे. हा प्रकल्प उपविभागीय कृषी अधिकारी कळवण राकेश वाणी तालुका कृषी अधिकारी विजय पाटील मंडळ कृषी अधिकारी ललित सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. प्रकल्पांतर्गत शेतकरी बांधवांना बाजरीच्या धनशक्ती या वाणाचे बियाणे २५ लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले.

मौजे दगड पिंपरी येथे सदर बियाणे वाटप करण्यात आले. हे बियाणे वाटप करताना शेतकरी बांधवांना बाजरी पिकाची बीजप्रक्रिया प्रात्यक्षिक कृषी पर्यवेक्षक उत्तम भुसारे यांनी करून दाखविले. तसेच कृषी सहाय्यक संदीपकुमार बोरवे यांनी शेतकरी बांधवांना बाजरीचे आहारातील महत्त्व पटवून सांगितले सदर कार्यक्रमास धर्मा चौधरी, उत्तम चौधरी, पंडित चौधरी, भगवान चौधरी, हिरामण चौधरी, कांतीलाल गायकवाड, उत्तम गवळी, नवनाथ aचौधरी आदींसह शेतकरी बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते कार्यक्रम यशस्वीतेसाठी कृषी पर्यवेक्षक उत्तम भुसारे व कृषी सहाय्यक संदीपकुमार बोरवे यांनी विशेष परिश्रम घेतले



> तृणधान्यात जास्तीत जास्त ऊर्जा देणारे पीक, कोलेस्टोरलची पातळी नियंत्रणात करते मॅग्नेशियम व पोटॅशियमचा उत्तम स्रोत रक्तदाब व वजन नियंत्रित करण्यासाठी मदत होते, बाजरीमध्ये सल्फर युक्त अमिनो आम्ल असल्यामुळे लहान मुले गर्भवती मातांसाठी उपयुक्त आहे. हिमोग्लोबिन वाढविण्यास मदत करते, हाडांना मजबुती देते असे अनेक प्रकारचे फायदे बाजरीचा वापर आहारात केल्याने फायदे होतात त्यामुळे सर्वांनी योग्य प्रमाणात बाजरीचे सेवन करावे.
>
> - **विजय पाटील,** तालुका कृषी अधिकारी दिंडोरी

Nashik Plus Edition
12 January 2023 Page No. 3
epaper.navarashtra.com

जानेवारी २०२३ सकाळ TODAY SakalNews @SakalMediaNews www.esakal.com २

### कृषी विभाग ; आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्षातील उपक्रम

## साडेअकरा हजार हेक्टरवर नाचणीची लागवड

रत्नागिरी, ता. १५ : आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्षानिमित्त यंदा रत्नागिरी जिल्ह्यात नाचणीची लागवड वाढविण्यासाठी कृषी विभागाला सूचना दिल्या आहेत. यामध्ये पीक व्यवस्थापन व प्रक्रिया उत्पादने प्रकल्प राबविला जाणार आहे. जिल्ह्यात दरवर्षी साडेनऊ हजार हेक्टरवर नाचणीची लागवड केली जाते. यंदा त्यात १५ टक्के वाढ केली जाणार असून, साडेअकरा हजार हेक्टरचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यासाठी तालुकानिहाय कार्यक्रम आयोजित केले जात आहेत.

नाचणी हे आहारदृष्ट्या इतर धान्यापेक्षा सर्वश्रेष्ठ अत्यंत महत्त्वाचे तृणधान्य पीक आहे. कॅल्शिअम, लोह, तंतुमय पदार्थ आणि मुबलक प्रमाणात खनिज आहेत. मात्र स्निग्ध पदार्थ (फॅट) अत्यंत कमी असल्याने नाचणी आरोग्याला हितकारक आहे. पचनास हलकी आणि ग्लुटेन नसल्यामुळे उपयुक्त ठरते. आरोग्याला पोषक अशा नाचणीच्या लागवडीला प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने रत्नागिरी जिल्ह्यात प्रयोग करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार उद्दीष्ट निश्चित करुन दिले आहे.

त्यासाठी जिल्हा परिषद कृषी विभागाकडून नियोजन करण्यात आले आहे. यंदाच्या वर्षात नाचणीची लागवड वाढविण्यात येणार आहे. सर्वाधिक लागवड गुहागर तालुक्यात होते. त्यापाठोपाठ राजापूर, दापोली, रत्नागिरी तालुक्याचा क्रमांक लागतो. पुर्वी खरीप हंगामात कातळावर मोठ्याप्रमाणात नाचणीची लागवड केली जात होती; परंतु माकडांसह जंगली प्राण्यांचा त्रास सुरु झाल्यामुळे नाचणीकडे अनेक शेतकऱ्यांनी पाठ फिरवली. त्यामुळे उत्पादनात मोठी घट झाली. नाचणी पिकात असलेले पौष्टिक घटक विचारात घेऊन शासनाकडून याला महत्त्व दिले गेले आहे.



चिपळूण : खेर्डी येथे जनजागृती कार्यक्रमात नाचणीचे पदार्थ बनविताना महिला.

**गतवर्षीची नाचणीची झालेली लागवड**

| तालुका | लागवड (हेक्टर) |
|---|---|
| मंडणगड | ८९८.०४ |
| दापोली | १३०.०४ |
| खेड | ७१० |
| गुहागर | २१००.६ |
| चिपळूण | ७०६.५७ |
| संगमेश्वर | ९७.३५ |
| रत्नागिरी | १३५४ |
| लांजा | ७१० |
| राजापूर | १५२७.३४ |

**नाचणी महत्त्व**

- नाचणी पदार्थ खाल्याने कोलेस्टॉर कमी होते
- हृदयाचे आजार, मधुमेहाचे प्रमाण घटते
- हाडे ठिसूळ होऊ नयेत यासाठी उपयुक्त
- गर्भ विकासासाठी गरोदर मातांना पोषक
- शरीर दणकट व काटक बनण्यासाठी पूरक

> नाचणी लागवड वाढविण्यासाठी त्यापासून बनविण्यात येणाऱ्या प्रक्रिया उत्पादनातून मिळणाऱ्या उत्पन्नाबाबत प्रचार, प्रसार केला जात आहे. त्याची चव लोकांपर्यंत पोचवण्यासाठी नाचणीचे पदार्थ विविध ठिकाणी विक्रीला ठेवले गेले आहेत. जनजागृती कार्यक्रमातही प्रात्यक्षिकं घेतली जात आहेत.
>
> - **श्रीमती सुनंदा कुऱ्हाडे,** जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी

INTERNATIONAL YEAR OF MILLETS 2023

# “महाराष्ट्र मिलेट मिशन” – २०० कोटी तरतूद

Azadi Ka Amrit Mahotsav

## राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत प्रकल्प

### तरतूद रु. ५० कोटी

क्षेत्र व उत्पादकता वाढ ,

आहारा संबधी प्रचार व प्रसिद्धी








नियोजन • कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

**पौष्टिक तृणधान्य वर्ष कार्यक्रमाचा आढावा**

चंद्रपूर,ब्युरो. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने संयुक्त राष्ट्रसंघाने 2023 हे वर्ष आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष म्हणून घोषित केले आहे. त्यामुळे आगामी 2023 हे वर्ष जागतिक स्तरावर आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून साजरे केले जाणार आहे. त्याअनुषगांने सदर कार्यक्रम जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील वीस कलमी सभागृहात जिल्हास्तरीय समितीची आढावा बैठक पार पडली, यावेळी ते बोलत होते.

बैठकीला प्रकल्प अधिकारी मुरुगानंथम एम. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भाऊसाहेब बऱ्हाटे, मनपा उपायुक्त अशोक गराटे, कृषी उपसंचालक रवींद्र मनोहरे, शिक्षणाधिकारी (माध्य.) कल्पना चव्हाण, कृषी विकास अधिकारी. दोडके, मनपा वैद्यकीय अधिकारी डॉ. वनिता गर्गेलवार, कृषी विज्ञान केंद्राचे डॉ. विनोद नागदेवते आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

जिल्हाधिकारी गौडा म्हणाले, ज्वारी या पिकासोबतच बाजरी व नाचणी आरोग्याला लाभदायक असून या पिकासाठी पाणीसुद्धा कमी लागते. त्यामुळे या पिकांची पेरणी क्षेत्रवाढ कशी करता येईल याकडे लक्ष द्यावे. पौष्टिक तृणधान्य कार्यक्रमाचे नियोजन वर्षभरात विविध विभागामार्फत करण्यात येणार असून यामध्ये विभागांचा सहभाग व त्यांची जबाबदारी काय असेल याबाबतचा आराखडा तयार करून नियोजन करण्याच्या सूचना कृषी विभागाला दिल्या.

भारत हा जगातील पौष्टिक तृणधान्य पिकवणारा एक प्रमुख देश आहे. यानिमित्त पुढीलवर्षी देश पातळीपासून ते गाव पातळीपर्यंतच्या सर्व स्तरावर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. पौष्टिक तृणधान्य वर्ष या संकल्पनेंतर्गत ज्वारी, बाजरी, नाचणी, वरई, राळा, कोडो, कुटकी, सावा व राजगिरा आदी पौष्टिक तृणधान्य पिकांच्या उत्पादन वाढीबरोबरच या पिकांच्या आरोग्य विषयक फायद्यांबाबत जनजागृती करून लोकांच्या आहारातील त्यांचे प्रमाण वाढविणे हा प्रमुख हेतू आहे.

शेत तिथे पौष्टिक तृणधान्य मोहिमेंतर्गत प्रत्येक शेतावर पौष्टिक तृणधान्य घेण्यासाठी या मोहिमेंतर्गत शेतकऱ्यांना पौष्टिक तृणधान्य पिकांचे बियाणे मिनी किट उपलब्ध करून द्यावयाच्या आहेत. भौगोलिक परिस्थिती व हंगाम यांचा विचार करून पौष्टिक तृणधान्य पिकाचे बियाणे मिनी किट वितरण करण्यात येणार आहे.

# “महाराष्ट्र मिलेट मिशन” - २०० कोटी तरतूद

## PMFME प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना

## तरतूद रु. ५० कोटी

पौष्टिक पिकाचे मूल्यवर्धन

प्रक्रिया संधी उपलब्ध करणे

आहारातील वापर वाढविणे







# PMFME योजनेंतर्गत पौष्टिक तृणधान्य पिकांसाठी मंजूर प्रकल्प संख्या

| अ.क्र. | जिल्हा | तृणधान्य प्रकल्प कर्ज मंजुरी संख्या | उत्पादने |
|---|---|---|---|
| १ | सोलापुर | ६४ | १. **ज्वारी**– पोहे, बिस्किटे, पीठ, भाकरी, चिवडा, पापड, सांडगे, लाह्या, ओट्स, इडली/डोसा प्रिमिक्स, कुकीज, रवा.<br>२. **नाचनी**– पीठ, बिस्किटे, लाडू, पापड, शेवया, सत्वे, सत्तु, रोटी, केक प्रिमिक्स, कुकीज.<br>३. **बाजरी**– पीठ, भाजनी पीठ, खारवडे.<br>४. **भगर**– पीठ, उपवास भाजनी पीठ, उपमा, पापड, केक प्रिमिक्स.<br>५. **राजगीरा**– लाडू, चिक्की, उपवास भाजनी पीठ, खीर प्रिमिक्स. |
| २ | ठाणे | ४९ | |
| ३ | नंदुरबार | ८ | |
| ४ | सांगली | ५ | |
| ५ | सिंधुदुर्ग | ५ | |
| ६ | भंडारा | २ | |
| ७ | पुणे | २ | |
| ८ | यवतमाळ | २ | |
| ९ | अहमदनगर | १ | |
| १० | कोल्हापूर | १ | |
| ११ | नांदेड | १ | |
| १२ | रायगड | १ | |
| १३ | रत्नागिरी | १ | |
| १४ | सातारा | १ | |
| | **एकुण** | **१४३** | |

# “महाराष्ट्र मिलेट मिशन” - २०० कोटी तरतूद

## मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (SMART)




### तरतूद रु. ५० कोटी

मूल्यसाखळी विकास

शेतकरी उत्पादक कंपन्याचे बळकटीकरण

बाजारपेठांशी जोडणी

### ३० नियोजित शेतकरी उत्पादक कंपन्या

## Center of Excellence for Millet ची स्थापना

### तरतूद रु. ६ कोटी

IIMR, हैद्राबाद यांचे सहकार्य


Barnyard Millet
Little Millet
Foxtail Millet
Finger Millet
Kodo Millet
Pearl Millet
Jowar

# धन्यवाद